**प्रकल्प प्रवर्तक, कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्रमांक ९, मंगळवेढा यांनी प्रस्तावित केलेल्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा जलसिंचन योजना, ता. सांगोला, जि. सोलापूर, महाराष्ट्र या उपसा सिंचन प्रकल्पा बाबतच्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृतांत.**

---

प्रकल्प प्रवर्तक, कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्रमांक ९, मंगळवेढा यांनी प्रस्तावित केलेल्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा जलसिंचन योजना, ता. सांगोला - जि सोलापूर, महाराष्ट्र या उपसा सिंचन प्रकल्पा बाबतची पर्यावरण विषयक जाहीर **जन** सुनावणी बुधवार, दिनांक ०४/०९/२०२४, दुपारी १२:०० वाजता बचत भवन सभागृह, पंचायत समिती सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर , महाराष्ट्र, येथे घेण्यात आली.

श्री. निखील मोरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मनिषा कुंभार, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तसेच प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण विषयक कार्यरत सेवाभावी संस्था, तसेच उपस्थित सर्व नागरीक, सन्माननिय लोकप्रतिनिधी, शेतकरी, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्था, पर्यावरण तज्ञ, विविध वृत्तपत्र व वृत्तवाहिनी माध्यमांचे प्रतिनिधी तसेच प्रकल्पाचे प्रतिनिधी, उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जन सुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक ०१ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

प्रकल्प प्रवर्तक, कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्रमांक ९, मंगळवेढा यांनी प्रस्तावित केलेल्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा जलसिंचन योजना, ता. सांगोला - जि सोलापूर, महाराष्ट्र या उपसा सिंचन प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई येथे प्राप्त झाला होता.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित अधिसूचने नुसार संवर्ग १(क), मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणामा बाबत सामान्य जनतेच्या भावना, मते, प्रकल्पाला विरोध किंवा सहमती जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी सदरहू प्रकल्पास पर्यावरण व हवामान बदल, महाराष्ट्र सरकार यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०१ ऑगस्ट २०२३ रोजी सादर केला व त्या अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक २ ऑगस्ट २०२३ रोजी प्रदान केली.

मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सदरची जनसुनावणी शुक्रवार दिनांक ४ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२:०० वाजता घेणे बाबत मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना २००६ व सुधारित अधिसुचना २००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई. 149/2024, व्दारा पत्र क्रं. BO/JD(WPC)PH/B-240826-FTS-0349 दि. 26/08/2024 अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली.

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | अध्यक्ष |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी प्रादेशिक अधिकारी -, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ,पुणे जिल्हा -पुणे, | - | सदस्य |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर | - | आयोजक |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र "दैनिक संचार" मध्ये मराठी व "दैनिक दिव्य मराठी" मध्ये इंग्रजी भाषेमध्ये जनसुनावणीबाबत जाहिरात दिनांक ३ ऑगस्ट २०२४ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहिती व अभ्यासाकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर,
२. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर,
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर,
४. तहसीलदार, तहसील कार्यालय- सांगोला, तालुका- सांगोला,, जिल्हा- सोलापूर,
५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती- सांगोला, तालुका- सांगोला, जिल्हा- सोलापूर,
६. ग्रामपंचायत कार्यालय मौजे - लक्ष्मीनगर, अचकदाणी, बगलवाडी, सोनलवाडी, अंजनाळे, मांगणेवाडी, बंदगरवाडी, चिकमहुड, काटफळ, खावसपूर, लोटेवाडी नवीन, लोटेवाडी, इटकी या गावांशी संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, जि. सोलापूर.
७. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
८. मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२
९. प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ३रा मजला, जोग सेंटर, जुना मुंबई-पुणे हायवे, वाकडेवाडी, पुणे - ४११ ००३
१०. उप प्रादेशिक अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ब/४, बाळी बिल्डिंग, सिव्हिल लाईन्स, शासकीय दूध डेअरीसमोर, सात रस्ता, सोलापूर - ४१३ ००३,

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की, आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना / आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन

प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेमार्फत शासनास सादर करण्यात येईल. त्यानंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सुरु करण्याची विनंती केली.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण करताना सांगितले की, सोलापूर जिल्ह्यातील वंचित १२ गावामधील २०००० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यासाठी जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांचे कडुन दि २७/०२/२०२४ रोजी २ अघफू (अब्ज घन फूट/ टिएमसी) पाणी उपलब्धेतेस मान्यता मिळालेली आहे. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विद्यमान जलसिंचन योजनेचा लाभ न मिळालेल्या १२ गावांना लाभ देणे आहे. १२ गावातील २०००० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ देणे प्रस्तावित आहे सादरीकरणा-नंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी कांही आक्षेप, सुचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक/ प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे:-

| अ. क्र. | स्थानिक रहिवासी/ शेतक-याचे नांव व गांव | मांडलेले मत, प्रश्न, सूचना व प्रकल्प प्रवर्तकांनी केलेला खुलासा |
|---|---|---|
| १ | श्री. श्यामराव शिंदे (माजी प्राचार्य), लिगाडेवाडी ता. सांगोला, जि. सोलापूर | **प्रश्नः**<br>या प्रकल्पांतर्गत १४ गावे येतात, या शासनाच्या प्रकल्पात सांगोला तालुक्यातील १४ गावांचा समावेश आहे. मी शेतकरी आहे, मी शिक्षित आहे माजी प्राचार्य लिगाडेवाडी. माझी लिंगडेवाडी येथे शेतजमीन आहे.<br>या सिंचन योजनेचे १४ गावांना लाभ होणार आहे. लिगडेवाडीचा या योजनेत समावेश आहे की नाही हे सूचित केले पाहिजे. लिगाडेवाडी गाव अंजनाळेच्या खाली आहे.<br>तर या ठिकाणी येणार बंद पाइपलाइन आमच्या शेतामधून जाणार त्या ठिकाणी ओढा आहे त्या ओढयाचे पण पाणी जर जास्त आलं तर त्यामुळे नुकसान होणार. या ठिकाणी माझी १०० एकर शेती आहे आणि या शेतीमध्ये जर चर काढली |

| अ. क्र. | स्थानिक रहिवासी/ शेतक-याचे नांव व गांव | मांडलेले मत, प्रश्न, सूचना व प्रकल्प प्रवर्तकांनी केलेला खुलासा |
|---|---|---|
| | | तरीपण या ठिकाणी पाणी येण्याची शक्यता आहे, त्यामुळे नुकसान होणार आहे.<br>आमच्याकडे शेतीमध्ये पाणी जर आलं तर त्यावर काय उपाययोजना केल्या जातील हे शासनाने सांगावे.<br>मी पुन्हा एकदा शासनाचा आभारी आहे.<br><br>**उत्तर:**<br>श्री नारायण जोशी, कार्यकारी अभियंता, उजनी कळवा विभाग ९, मंगळवेढा म्हणाले की, सध्या, स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना, सांगोला अंतर्गत लाभार्थी गावांच्या यादीत लिगडेवाडीचा समावेश नाही; तथापि, स्त्रोताकडून अतिरिक्त पाणी वाटप झाल्यास, लिगडेवाडीचा सिंचन योजनांमध्ये समावेश करण्यासाठी आम्ही निश्चितपणे विचार करू. |
| २ | श्री. दादासाहेब लोहके | आज या ठिकाणी उजनी कालवा विभाग ९ स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना सांगोला याची पर्यावरण विषयक उप प्रादेशिक कार्यालय सोलापूर यांची जनसुनावणीसाठी उपस्थित सर्व अधिकारी वर्ग आणि प्रादेशिक अधिकारी वर्ग त्याचप्रमाणे या १३/ १४ गावातून उपस्थित असलेले सगळे शेतकरी पर्यावरणाच्या विषयांमध्ये निश्चितपणे आपण सगळ्यांनी या शेतकऱ्यांना बोलवून घेतलं आणि ज्या ज्या योजना राबवत असताना होणाऱ्या नुकसान आणि त्याच्यावरती उपाय योजना ही या ठिकाणी सांगितलं<br>खऱ्या अर्थाने राज्य सरकार आणि मुख्यमंत्री साहेब, तालुक्याचे आमदार साहेब यांनी खूप मोठे प्रयत्नातून योजना आणली आमच्या १३/ १४ गावांसाठी ही योजना निश्चितपणे वरदान आहे आणि लोकांच्या जीवनमानामध्ये, शेतीमध्ये, पशुधनांमध्ये चांगल्या पद्धतीने निश्चित पणे असं बदल |

| अ. क्र. | स्थानिक रहिवासी/ शेतक-याचे नांव व गांव | मांडलेले मत, प्रश्न, सूचना व प्रकल्प प्रवर्तकांनी केलेला खुलासा |
|---|---|---|
| | | होणार आहे त्याबद्दल राज्य सरकारचंही आम्ही या ठिकाणी मनःपूर्वक आभार मानतो आणि पर्यावरण सुनावणीला आलेल्या सगळ्यांना आम्ही एवढेच सांगतो की, निश्चितपणे तुम्ही या ठिकाणी उपाययोजना केलेत पण ज्या ज्या गोष्टीची गरज पडेल आम्ही स्थानिक म्हणून आपल्या पाठीशी निश्चितपणे उभा राहून हा प्रकल्प चांगल्या पद्धतीने मार्गी लावण्याचा आम्ही या ठिकाणी सांगोला तालुक्याच्या वतीने शब्द देतो. |
| ३ | श्री. माणिक सदाशिव भोसले रिटायर्ड आयपीएस ऑफिसर ता. सांगोला, जि. सोलापूर | मला आत्ताच कळले शिवणे आणि वाकी गावांचा या योजनेत समावेश आहे बलदेवाडी आणि धायटी यांचाही या योजनेत समावेश झाल्यास तर एकदम चांगलं होईल त्यामुळे त्यांना पाणी मिळाले तर त्या गावांचा चांगला विकास होईल<br>आणि दुसरे एक असं की वृक्ष लागवड वगैरे आपण करत असताना स्थानिक प्रजातीच्या झाडे लावा<br>प्रजाती निवडताना वन विभागाशी संपर्क साधून प्रजाती निवडल्या तर फार उत्तम |
| ४ | श्री. संजय शिंदे सोनलवाडी ता. सांगोला, जि. सोलापूर | मला आमच्या गावात केलेल्या सर्वेक्षणाची pdf (माहिती) हवी आहे<br>**उत्तर:**<br>श्री नारायण जोशी, कार्यकारी अभियंता, म्हणाले की सर्वेक्षण नाकाशयाची PDF (माहिती) त्यांना देण्यात येईल |

त्यानंतर मा. श्री. निखील मोरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी पुनःश्च एकदा आपली मते मांडावयाची असल्यास उपस्थितांना/ शेतक-यांना आवाहन केले.

त्यानंतर श्री जगन्नाथ साळुंके, प्रादेशिक अधिकारी, पुणे यांनी आपले मत पुढील प्रमाणे मांडले. सर्व प्रथम कमी पाण्यामध्ये जास्तीत जास्त उत्पादन कसे निघेल, विद्यमान गावे

कोणती आहेत, विद्‌यमान पीक पाणी कसे आहे, माती परीक्षण करणे अशा पद्‌धतीने अभ्यासपूर्ण जागरूकता करणे शासनाचा दृष्टिकोनातून गरजेचे आहे त्या संदर्भात आपल्या स्तरावर गावोगावी जागरूकता होणे आवश्यक आहे, असे आम्हाला वाटते. माझ्या दृष्टीने हा प्रश्न शेतकऱ्यांसाठी/ बागायतदारांसाठी आहे. विद्‌यमान गावातील सर्व पाटांना पाणी मिळणार का? पाणी साचल्यामुळे नुकसान होईल का? त्या भागात पुनर्वसन करता येईल का? असा विचार करत आहेत आणि ह्या सर्व प्रस्ताव माननीय अध्यक्षांच्या वतीने आम्ही शासनास सादर करू आणि त्याच्यानंतर त्याच्यावर योग्य ते निर्णय होईल; आता आम्ही कोणत्याही निर्णय घेणार नाही आपले विचार ऐकून घेण्यात आलेले आहेत त्या संदर्भात जे काही तुमची टीका टिपणी आक्षेप आहे त्याची नोंद व्यवस्थित होईल आणि सर्व प्रस्ताव आमच्या तर्फे शासनास सादर होईल.

त्यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा. मनिषा कुंभार, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हा दंडाधिकारी, सोलापूर यांनी आपले मत पुढील प्रमाणे मांडले.स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेच्या पर्यावरणीय जनसुनावणीच्या निमित्ताने व्यासपीठावर उपस्थित असलेले साळुंखे साहेब प्रादेशिक अधिकारी त्याचबरोबर मोरे साहेब उपप्रादेशिक अधिकारी, जलसंपदा विभागाचे सर्व अधिकारी त्याचबरोबर संबंधित गावातील सर्व ग्रामस्थ; आजच्या जनसुनावणी मध्ये संबंधित विभागाने त्यांचे सादरीकरण केलेले आहे, आपली भूमिका या जन सुनावणीमध्ये अशी आहे की, या सादरीकरणाच्या आधारावर आपणाला कुणाला काही शंका असतील त्याचं स्पष्टीकरण इथे करणे, त्याच्यामध्ये तुम्हाला काही सूचना असतील तर त्या सूचनांना अंतर्भूत करणे आणि त्याच्यामध्ये जर काही आक्षेप असतील तर ते सगळे नमूद करणे आणि हा सगळा एकत्रित अहवाल पर्यावरण विभागाच्या मार्फत शासनाला सादर करणे असे या जन सुनावणीची एक सीमा असते आणि त्या आधारावर हा अहवाल आहे तो जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांच्या वतीने म्हणून मी येथे उपस्थित आहे आणि माझ्यासमोर ही जनसुनावणी पूर्ण झालेली आहे. अजुनही आपणाला काही हरकत असेल किंवा काही सुचना असतील तर ते मांडण्याबाबमत अवाहन केले.

पुरेसा अवधी दिल्यानंतरही उपस्थितांकडून कोणतीही सूचना, आक्षेप अथवा विरोध नोंदवला गेला नाही. त्या नंतर, जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांनी जनसुनावणी पूर्ण झाली असे जाहीर केले..

बैठकीचा समारोप करताना आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, प्रसंगी उपस्थितांनी जे काही मत व्यक्त केलेले आहे त्याचे इतिवृत्तांमध्ये

नोंद घेतली जाईल आणि माननीय अध्यक्ष यांनी सांगितल्याप्रमाणे याचा अहवाल शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल असे सांगतले व सोलापूर जिल्ह्याच्या अपर जिल्हादंडाधिकारी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, उजनी कालवा विभाग क्र. ९ मंगळवेढा सोलापूर महाराष्ट्र शासन यांचे अधिकारी व परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी यांचे बैठकीत उपस्थित राहून प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल सर्वाचे आभार मानले आणि मा. अध्यक्षा यांच्या वतीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले

**(निखिल मोरे)**
आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ, सोलापूर

**(जगन्नाथ साळुंखे)**
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, पुणे

**(मनिषा कुंभार)**
अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा,
अपर जिल्हा दंडाधिकारी, सोलापूर